# पत्नीच्या चेहऱ्यावर फेकले ॲसिड

## अकोली परिसरातील म्हाडा कॉलनीतील घटना | पोलिसांनी आरोपी पतीस घेतले ताब्यात



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )** - पैशाच्या व्यवहारातून उसळलेल्या वादात पतीने पत्नीच्या तोंडावर ॲसिड फेकल्याची धक्कादायक घटना गुरुवारी रात्री अकोली नजिक म्हाडा कॉलनीत घडली. पत्नीच्या चेहऱ्याची आणि मानेची त्वचा काही प्रमाणात भाजली. या प्रकरणी खोलापुरी गेट पोलिसांनी शुभम भास्कर आंधळे (26) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे.

32 वर्षीय पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, तिचे पहिले लग्न 2012 मध्ये झाले होते आणि तिला तिच्या पहिल्या पतीपासून 11 वर्षांचा मुलगा आहे. जो सध्या तिच्या माहेरच्या घरी राहतो. अमरावती येथे राहत असताना ती एका ज्वेलर्सच्या दुकानात सेल्सगर्ल म्हणून काम करते. यादरम्यान तिची शुभम आंधळे याच्याशी 3 वर्षांपूर्वी ओळख झाली. त्याच्यासोबत प्रेमसंबंध जुळल्यानंतर तिचे आणि शुभम आंधळेचे लग्न झाले. मात्र लग्न झाल्यापासून शुभम आंधळेला तिच्या चारित्र्यावर संशय असायचा. याशिवाय पैशाची मागणी करून तो नेहमी तिच्याशी भांडण करीत असे. फिर्यादी महिलेने दिलेल्या माहितीनुसार, 5 डिसेंबर रोजी रात्री 9 वाजता शुभम आंधळे हा नेहमीप्रमाणे तिच्या दुचाकीवरून तिला ज्वेलर्सच्या दुकानातून घरी नेण्यासाठी आला आणि त्यानंतर दोघेही दुचाकीवरून घराकडे निघाले. यावेळी शुभम आंधळे याने साई नगरजवळील एका दुकानात वाहन थांबवून काही खरेदी करून खिशात ठेवले. त्यानंतर घरी आल्यावर शुभमने पत्नीला 3500 रुपये मागितले, तिने पैसे देण्यास नकार दिला. त्यामुळे त्याने तिच्याशी भांडण व धक्काबुक्की सुरू केली.

या दरम्यान तिचा मोबाईल जमिनीवर पडला आणि फुटला. त्यामुळे पत्नीने चिडून शुभमच्या दुचाकीवर दगड फेकून हेडलाइट तोडली आणि दुचाकी खाली पडली. यावेळी ती घरात जात असताना शुभमने तिला मध्येच पकडले आणि खिशातून बाटली काढून त्यातील ॲसिड तिच्या चेहरूयावर ओतले. त्यामुळे पत्नीच्या चेहरूयावर, डोळ्यात आणि घशात जळजळ होऊ लागली. त्यामुळे तिने तत्काळ बाथरूममध्ये जाऊन तोंडावर व मानेवर पाणी घेतले. तोपर्यंत तीची नणंद आपल्या पतीसह तेथे पोहोचली. त्यांनी 112 वर डायल करून पोलिसांना माहिती दिली आणि तिला तत्काळ इर्विन रुग्णालयात दाखल केले. तेथे तिच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. महिलेने दिलेल्या जबानीवरून खोलापुरी गेट पोलिसांनी गुन्हा दाखल करून शुभम आंधळे याला ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू केला आहे.

# लाखो रुपयांच्या गुटख्यासह तस्कर पकडला

## ब्राम्हणवाडा थडी पोलिसांची कारवाई




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.6 )**- मध्यप्रदेशातून महाराष्ट्रात गुटखा घेऊन येणाऱ्या तस्कराला ब्राम्हणवाडा थडी पोलिसांनी अटक केली. 5 डिसेंबर रोजी चिंचकुभ ते रेडवा मार्गादरम्यान ती कारवाई करण्यात आली. आरोपीकडून प्रतिबंधित पानमसाला, गुटख्यासह चारचाकी वाहन असा एकुण 8 लाख 39 हजार 650 रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संतोष सत्यनारायण शर्मा (वय 44 वर्ष रा. साईनगर कांडली परतवाडा) असे अटक गुटखा तस्कराचे नाव आहे. त्याच्याविरूध्द ब्राम्हणवाडा थडी पोलिसांनी 6 डिसेंबर रोजी गुन्हा दाखल केला.

प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक करणारे एक चारचाकी वाहन मध्यप्रदेशकडून रेडवाकडे येत असल्याची माहिती ब्राम्हणवाडा थडी पोलिसांना गुरूवारी मिळाली. त्याआधारे पोलिसांनी 5 डिसेंबर रोजी रात्री 11.30 च्या सुमारास चिंचकुभ ते रेडवा मार्गावर सापळा रचला. मात्र वाहन चालकाला पोलिसांची चाहुल लागताच त्याने आपली कार वाहन भरधाव वेगाने रेडवा गावाकडे दामटली. पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या त्या तस्कराचा पोलिसांनी पाठलाग केला. तथा त्याला रेडवा गावाच्या पुढे रोडवर थांबविले. त्याच्याकडील एमएच 27 बीझेड 1036 ही कार तपासली असता त्यात सुगंधित पान मसाला मिळून आला. त्यानुसार पोलिसांनी संतोष शर्मा याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून गुटखा व कार जप्त केली. पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत व अचलपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी शुभम कुमार यांच्या मार्गदर्शनात ब्राह्मणवाडा थडीचे ठाणेदार उल्हास राठोड, पोलीस उपनिरीक्षक साहेबराव राजस, साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक किसन सपाट, राजेश तायडे, राजू मरस्कोल्हे, अनुप मानकर, दिलीप उईके यांनी केली.

# देशी बनावटीच्या पिस्तुलसह तिघांना अटक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती** – राजापेठ येथील देशी दारू दुकानाजवळ दादागिरी करणाऱ्या तीन तरुणांना पोलिसांनी पकडले असता, त्यांच्याजवळ देशी बनावटीचे पिस्तूल आढळून आले. ते पोलिसांकडून जप्त करण्यात आले. ही कारवाई 4 डिसेंबर रोजी रात्री 8.30 वाजता करण्यात आली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये मोहम्मद दानिश मोहम्मद वाहेद (28), शहजाद शहा नझाकत शहा (24, दोघेही रा.रहमत नगर गली क्र. 6) आणि जाहिद खान जाकीर खान (22, रा. रहमत नगर गली क्र. 8) यांचा समावेश आहे. राजापेठ पोलिस ठाण्यापासून काही अंतरावर असलेल्या भामोरे यांच्या देशी दारूच्या दुकाना समोर काही तरुण शस्त्रांचा धाक दाखवून दादागिरी करीत असल्याची माहिती पोलिस पथकाला मिळाली. या माहितीवरून पोलिस हवालदार सुरेंद्र इंगोले व त्यांच्यासह इतर कर्मचारी घटनास्थळी गेले. यावेळी तिन्ही आरोपींचा एका तरुणासोबत वाद सुरू होता. पोलिसांनी आरोपींना समजवण्याचा प्रयत्न केला असता त्यांचीही पोलिसांशी बाचाबाची झाली. पोलिसांनी तिन्ही आरोपींना पकडून त्यांची अंगझडती घेतली असता, जाहिद खान जाकीर खान यांच्याजवळ देशी बनावटीचे पिस्तूल आढळून आले. पोलिसांनी देशी बनावटीच्या पिस्तुलाच्या परवान्याबाबत विचारणा केली असता आरोपीने कोणतेही उत्तर दिले नाही. जप्त केलेल्या देशी पिस्तुलाची किंमत 20 हजार रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. पोलिसांनी आरोपी मोहम्मद दानिश मोहम्मद वाहीद, शहजाद शाह, नजाकत शाह, जाहिद खान झाकीर खान यांच्याविरुद्ध बेकायदेशीरपणे देशी बनावटीचे पिस्तूल बाळगणे आणि सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याच्या कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

# गोवंश मासाची वाहतुक करणाऱ्याला पकडले

## मोर्शी पोलिसांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 6 )** – गोवंश मासाची वाहतुक करणार्या एका आरोपीला मोर्शी पोलिसांनी 6 डिसेंबर रोजी पकडले. शेख सुलतान शेख साबीर कुरेशी (32, रा. अंबाडा, ता. मोर्शी) असे आरोपीचे नाव असून, त्याच्या ताब्यातून गोवंश मास व दुचाकी जप्त करण्यात आली आहे.




मोर्शी ठाण्याचे डि. बी पथक प्रमुख पोलिस उपनिरीक्षक अमोल बुरकुल यांना गोपनिय माहीती मिळाली की, अंबाडा येथील एक ईसम त्याचे ताब्यातील बजाज प्लॅटीना कंपनीची मोटर सायकल क्रमांक एम.एच 27 डि के 2317 वर गोवंशाचे मांस विक्रीकरीता वाहतुक करणार आहे. अशा माहीतीवरून पोलिसांनी मोर्शी ते चांदुर बाजार रोडवर स्मशानभुमी जवळ नाकाबंदी केली आणि चांदुर बाजार रोडने मोर्शीकडे एका वाहनास थांबविले. त्यावेळी दुचाकीस्वाराजवळील कॅरेटमध्ये मास दिसून आले. त्यामुळे पोलिसांनी चालक शेख सुलतान शेख साबीर कुरेशी याला ताब्यात घेतले. पोलिसांनी एकुण 94 हजार रुपये किमंतीचा माल जप्त करण्यात आला. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर, मोर्शीचे पोलिस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनात डि.बी पथक प्रमुख पोलिस उपनिरीक्षक अमोल बुरकुल, पोलिस हवालदार छत्रपती करपते व स्वप्नील बायस्कर यांनी केली आहे.

# तेरा वर्षाच्या मुलीचे अपहरण

**वरुड** – अज्ञात आरोपीने एका तेरा वर्षाच्या मुलीचे घरातून अपहरण केल्याची खळबळ जनक घटना वरुड पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. मुलगी 4 डिसेंबर रोजी दुपारी नेहमीप्रमाणे घरात बसली असताना बाहेर खेळण्यासाठी जात असल्याचे सांगून गेली, परंतु उशिरा रात्रीपर्यंत ती घरी परतलीच नाही. सर्वत्र शोध घेऊनही मुलगी न मिळून आल्याने आई-वडिलांनी अखेर वरुड पोलीस ठाण्यात तक्रार दिली. आईवडिलांच्या तक्रारी वरून संशय व्यक्त केल्याने पोलिसांनी याबाबत अज्ञात आरोपी विरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. या अल्पवयीन मुलीला पोलीस केव्हा शोधणार याकडे मात्र सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागलेले आहेत.

# चालत्या रेल्वेत तरुणावर चाकूने हल्ला

## टिमटाळा जवळील घटना




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 6 )** – अमरावती-नागपूर-अमरावती रेल्वे गाडीतून अमरावतीत येत असताना टीमटाळा जवळ एका तरुणावर अज्ञाताने चाकू हल्ला केला. चतर रघुनाथ शिंदे (वय 35 रा. दसरा मैदान, पो. स्टे. राजापेठ) असे जखमीचे नाव आहे. त्याला 5 डिसेंबर रोजी रात्री जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचाराकरिता दाखल करण्यात आले होते.

चतर शिंदे हा आपल्या कुटुंबीयांसोबत नागपूरवरून अमरावतीकडे रेल्वेने येत होते. दरम्यान टीमटाळ्याजवळ चालत्या रेल्वेत चतर शिंदेवर एका आरोपीने चाकू हल्ला केला आणि तो फरार झाला. या घटनेनंतर जखमी चतरला त्याच्या कुटुंबातील सदस्यांनी अमरावती रेल्वे स्टेशनपर्यंत आणले. त्यानंतर त्यांना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. चतरवर हल्ला कोण व कशामुळे केला, ही बाब पुढे आली नाही. घटनास्थळ बडनेरा पोलिस स्टेशनच्या हद्दीतील आहे. त्यामुळे या घटनेची माहिती रेल्वे पोलिसांना देण्यात आली.

# शिक्षण विभागासह संगई संस्थेला उच्च न्यायालयाच्या नोटीस

## अन्यायकारक शुल्क वसुली प्रकरण झाले न्यायप्रविष्ठ


IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
NAGPUR BENCH, NAGPUR.
WRIT PETITION NO.6172 OF 2024
... Vs. The Deputy Director of Education, Amravati and ors.
CORAM : NITIN W. SAMBRE AND MRS VRUSHALI V JOSHI, JJ.
DATE : October 15, 2024
1. Heard.
2. Issue notice to the respondents, returnable on 09/12/2024.
3. Shri A. S. Fulzele, learned Additional Government Pleader waives service of notice for respondent Nos.1 and 5.
(Mrs Vrushali V Joshi, J.) (Nitin W Sambre, J.)






**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि.6 )**- सन 2012 पासून विद्यार्थ्यांकडून अन्यायकारक शुल्क (फी) वसूली केल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने येथील सिताबाई संगई शिक्षण संस्थेसह प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना नोटीस बजावून जवाब विचारला आहे.

सामाजिक कार्यकर्ते कुशल चौधरी यांनी ही याचिका उच्च न्यायालयात दाखल केली आहे. आता शिक्षण विभाग व संस्थेच्या संचालक मंडळाला आगामी दि. 9 डिसेंबर 2024 पर्यंत आपणे म्हणणे दाखल करावे लागणार आहे. या प्रकारामूळे येथील शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

सविस्तर वृत्त असे की, अंजनगाव सुर्जी येथील कुशल चौधरी यांचा पाल्य सन 2012 मध्ये अंजनगाव सुर्जी येथील सीताबाई संगई विद्यालयात शिकायला होता. यादरम्यान सदर शिक्षण संस्थेने शुल्क वसूल केली होती. परंतू हे शुल्क वसूली अवैध असल्याचे कुशल चौधरी यांचे म्हणणे होते. त्यांनी याबाबत शाळा व्यवस्थापनाशी पत्रव्यवहार करुन 2012 ते 2022 पर्यंतची संपूर्ण माहिती गोळा केली. त्या बाबत शिक्षण विभाग अमरावती उपसंचालक तसेच जिल्हा शिक्षणाधिकारी व शिक्षण आयुक्त कार्यालय पुणे यांच्याकडे रितसर नियमाने तक्रारी दाखल केल्या. सतत तक्रारी करुनही शिक्षण विभागाकडून या प्रकाराची गंभीर दखल घेत नसल्याने कुशल चौधरी यांनी थेट उच्च न्यायालयात दाद मागत एक याचिका दाखल केली.

### असा होता शिक्षण विभागाचा अहवाल

चौधरी यांनी दिलेल्या तक्रारीवर विस्तार अधिकारी शिक्षण जिल्हा परिषद गंगाधर मोहने व गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती अजित पाटील यांची दोन सदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. तत्कालीन उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) बुद्धभूषण सोनोने याच्यांसमक्ष त्यांनी आपला अंतिम अहवाल चौकशी अहवाल सादर केला होता. या चौकशी अहवालावरुन तत्कालीन शिक्षणाधिकारी प्राथमिक डी.आर. खरात यांनी दि.14 फेब्रुवारी 2023 रोजी सीताबाई संघई एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष व सचिव सीताबाई संगई प्राथमिक शाळा यांना नोटीस बजावली, त्यामध्ये स्पष्ट उल्लेख केला की, चौकशी अंती शाळा प्रशासन व संस्था यांच्याद्वारे अल्पसंख्याक शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले आहे, तसेच पालकाकडून अनधिकृतरित्या निधी जमा करून शासन मान्यतेच्या अटी शर्तीचे उल्लंघन केल्याची आढळून आहे, सदर निधी वसूल पात्र ठरवून शाळेची शासनमान्य मान्यता रद्द करण्यात शिफारस शासनात का करण्यात येऊ नये? अशी विचारणा करण्यात आली होती. अहवालात शाळा संस्था दोषी ते कारवाईस पात्र ठरत असल्याचे स्पष्टपणे सांगितले होते, परंतु पुढे संस्थेवर किंवा दोषी व्यक्तींवर कुठलीच कारवाई शिक्षण विभागाकडून करण्यात आली नाही.

### चौकशी समितीकडून विरोधात अहवाल

तत्पुर्वी पालक कुशल चौधरी यांनी सीताबाई संगई शिक्षण संस्थेला माहितीच्या अधिकारात विद्यार्थ्यांकडून होत असलेल्या अन्यायकारक शुल्क वसुली विषयी माहिती अधिकारात माहिती मागविली होती. परंतू संस्थेकडून आम्हाला माहितीचा अधिकार लागू होत नाही, असे वारंवार उत्तर देऊन माहिती देणे टाळले. याबाबत कुशल चौधरींनी शिक्षणाधिकारी यांच्याकडे सुद्धा तक्रार केली होती. या प्रकरणाची शिक्षण विभागाने चौकशी केली. दि. 7 नोव्हेंबर 2022 रोजी शिक्षणाधिकारी माध्यमिक अमरावती यांनी सीताबाई संघई एज्युकेशन सोसायटी अध्यक्ष तसेच सीताबाई संगई कन्या शाळा, सीताबाई संगई हायस्कूल यांना नोटीस बजावली व त्यामध्ये चौकशी करून शिक्षण विभागांनी सदर प्रकरणात सीताबाई संघई शाळा मुख्याध्यापक व संस्था ही दोषी आहे व त्यांनी प्रती विद्यार्थी 3000 हजार रुपये अन्यायकारक शुल्क वसुली केल्याचे चौकशी समितीत सिद्ध झाले. तसेच त्यांनी शासन मान्यतेच्या अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याचे उघड झाले.

### दाद न मिळाल्याने कोर्टात याचिका

चौधरी यांनी वेळोवेळी तक्रारी दाखल केल्या. मात्र त्यावर अमरावती शिक्षण विभागाने कोणतीच कारवाई केली नाही, त्यामूळे चौधरी यांनी नागपूर उच्च न्यायालयात दाद मागितली आहे. या प्रकरणात सिताबाई संगई व्यवस्थापन समिती मुख्याध्यापक, प्राचार्यासह अमरावतीच्या शिक्षण विभाग, अंजनगाव सुर्जी येथील गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती अंजनगाव असे एकूण 9 जणांना यात प्रतिवादी करण्यात आले आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकी चालकाचा मृत्यू

## लाखारा फाट्यावरील घटना वाहन चालक फरार

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.6 )**- बेनोडा पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या लाखारा फाट्यावरील अपघाताची मालिका सुरूच असून गेल्या आठवड्यात लाखारा फाट्याजवळ झालेल्या अपघातात चौघांचा बळी गेल्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणी अज्ञात वाहनाने दुचाकीला दिलेल्या धडकेत मोर्शी येथील युवकाचा दुर्दैवी अंत झाल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

प्राप्त माहितीनुसार, मोर्शी येथील अनिकेत राईकवार (वय 25) हा युवक एमएच 27/ डीओ 1754 क्रमांकाच्या दुचाकी ने शहापूर पुनर्वसन येथून मोर्शीकडे येत असताना अज्ञात भरधाव व अनियंत्रित पिकअपने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली, ही धडक एवढी जोरदार होती की या धडकेत अनिकेत राईकवार हा गंभीरित्या जखमी झाला. अपघात झाल्याने रस्त्याने येजा करणाऱ्यांच्या निदर्शनास येतात काहींनी बेनोडा शहीद पोलिसांना माहिती दिली, त्यानंतर अनिकेतला मोर्शीच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु उपचारादरम्यान अनिकेतचा मृत्यू झाला. धडक देणारा पिकअप वाहनाचा चालक मात्र वाहनासह घटनास्थळावरून पसार झाला होता.

पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा करून अनिकेतचा मृतदेह वरुडच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आला, याप्रकरणी बेनोडा शहीद पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.


## नगर परिषद कार्यालय, चांदूर रेल्वे, जि. अमरावती

**ऑफलाईन निविदा सुचना क्र.१/२०२४-२०२५/पा.पु.स्व.वि./न.प.चांदूर रेल्वे**

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता खालील कामाच्या ऑफलाईन द्विलिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे. तरी निविदा धारकाला कोरे निविदा फॉर्म दि. ०९/१२/२०२४ ते दि. १७/१२/२०२४ पर्यत कार्यालयीन वेळेत सायंकाळी ४.०० वाजे पर्यंत अनामत रक्कम जमा करून रोखपाल यांच्या कडून प्राप्त करून घेता येईल. निविदा धारकांनी दि. २०/१२/२०२४ ला सायंकाळी ५.०० ला शक्य झाल्यास उघडण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा किंमत | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | माझी वसुंधरा अभियाना अंतर्गत प्राप्त बक्षीस रक्कमेचा सविस्तर प्रकल्प (DPR) तयार करणे करीता एजन्सी नियुक्त करणेबाबत. | ५००/- | २०००/- |

अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळेल.

जा.क्र. ८७५/नपचांरे/पापुस्व.वि/२०२४/दि. ०६/१२/२०२४

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद चांदूर रेल्वे**


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# हजारो अनुयायांचे भीमरायाला वंदना

## महापरिनिर्वाण दिन निमित्त्य जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन

*महासागर प्रतिनिधी*

*अमरावती,( दि.6 )-भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब ( भीमराव )आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या औचित्यावर हजारो अनुयायांनी आपल्या लाडक्या भीमरायाला मानवंदना दिली. महापरिनिर्वाण दिनानिमीत्त जिल्हाभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील इर्विन चौकात शेकडो अनुयायांनी बाबासाहेबांच्या पुतळ्याला हारअर्पण करुन आदरांजली व्यक्त केली. अनेक तालुक्यांमध्ये बाबासाहेबांच्या स्मरणार्थ कॅडल मार्चसुध्दा काढण्यात आला.*



## डॉ.आंबेडकरांचे विचार युगा युगापर्यंत पथदर्शी-खा.बोंडे



**वरुड** – समाजातील प्रत्येक घटकाला मुख्य प्रवाहात आणून बाबासाहेबांनी या देशाला क्रांतिकारी विचार दिले, त्यांचे हे विचार युगायुगापर्यंत पथदर्शी असतील असे प्रतिपादन राज्यसभेचे सदस्य डॉ. अनिल बोंडे यांनी केले. महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. अनिल बोंडे व डॉ.वसुधा बोंडे यांनी बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, बाबासाहेबांनी समाजातील प्रत्येक घटकाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अपार कष्ट घेतले. शोषित, पीडित, वंचित समाज घटकांचे प्रतिनिधित्व करताना त्यांनी विविध क्षेत्रात त्यांच्या कार्याचा ठसा उमटवला आहे. त्यामुळेच बाबासाहेब आज केवळ भारतातच नव्हे तर विश्वाला वंदनीय आहेत. संपूर्ण जग त्यांच्या विचारांचे आजच्या दिवशी स्मरण करत आहे. भारतरत्न, महामानव, बोधिसत्व, प्रज्ञासूर्य, घटनाकार अशा कित्येक उपाध्यांनी त्यांचा सन्मान देखील करण्यात आला आहे. त्यांच्या असीम त्याग आणि परिश्रमातून सर्वात पवित्र असलेला संविधान हा ग्रंथ आकाराला आला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री पदाची शपथ घेण्यापूर्वी कपाळाला संविधान लावून संसदेत प्रवेश केला. त्यामुळे भारतीय संविधान समाजाच्या प्रत्येक घटकाला वंदनीय आहे. त्याचेच अनुकरण करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने संविधान केंद्रस्थानी मानत राज्यातील विद्यापीठे, शासकीय औद्योगिक संस्थांमध्ये संविधान शिल्प देखील उभारले आहे. शेकडो विद्यार्थ्यांना संविधान शिल्प हे प्रेरणा देत आहे, असेही त्यांनी प्रामुख्याने नमूद केलं.

## मनपातर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन



**अमरावती** – महापरिनिर्वाण दिनानिमित्य विश्वदरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अमरावती महानगरपालिकेतर्फे विनम्र अभिवादन करण्याातत आले. महापरिनिर्वाण दिनानिमित्य महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख यांचे शुभहस्तेल डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याम प्रतिमेस हारार्पण महानगरपालिका कॉन्फिरन्स हॉल येथे करण्यीात आले. उपरोक्त कार्यक्रमानंतर विश्वॉरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला महानगरपालिका आयुक्त तथा जिल्हापधिकारी सौरभ कटियार यांचे हस्तों हारार्पण करण्याबत आले. या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त शिल्पाी नाईक, उपायुक्त डॉ.मेघना वासनकर, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, मुख्यिलेखापरिक्षक श्याकमसुंदर देव, शहर अभियंता ईश्वशरानंद पनपालिया, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय



जाधव, उद्यान अधिक्षक श्रीकांत गिरी, कार्यालय अधिक्षक नंदकिशोर पवार, स्वापस्थ अधिक्षक श्रीकांत डवरे, महानगरपालिका संघटनेचे सरचिटणीस प्रल्हावद कोतवाल, शैलेश वैद्य, संजय दारव्हेनकर, ज्यो ती पारडशिंगे, प्रल्हावद चव्हौण, प्रितम रामटेके, मनिष हिरोडे, प्रमोद मोहोड, आकाश तिरथकर, भुषण खडेकार, विजय आवारे, शिवा फुटाणे, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येयने उपस्थित होते.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन




**अमरावती** – नेहरू युवा केंद्रातर्फे मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख अध्यक्षस्थानी होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा युवा अधिकारी स्नेहल बासुतकर, प्रा. डॉ देविदास बांबोळे, प्रा. जनार्दन सांगोळे, प्रा. डॉ. मंदा नांदूरकर आदी उपस्थित होते. डॉ. सतीश तराळ यांनी यावेळी मार्गदर्शन केले. प्रा. रूपाली तळेगावकर यांनी सूत्रसंचालन केले.

## बाबासाहेबांचा आदर्श समोर ठेवावा - डॉ. जामठे



**अमरावती**– डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक हाल-अपेष्टा सहन करून उच्च शिक्षण मिळविले. त्या संपूर्ण शिक्षणाचा व ज्ञानाचा उपयोग हजार वर्षापासून शिक्षणापासून वंचित राहिलेल्या समाजाकरिता व देशहिताकरीता केला. हा त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन विद्यार्थ्यांनी निती व सदाचाराने वर्तन करुन सुजाण नागरिक बनावे असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते डॉ.राजीव जामठे यांनी केले.

सर्वोदय कॉलणी,अमरावती येथील संत रविदास महाराज सभागृह राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने आयोजित महापरिनिर्वाण दिनानिमित्य आयोजीत कार्यक्रमात ते बोलत होते. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून उपस्थित सर्व मान्यवरांनी विनम्र अभिवादन केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ.राजीव जामठे, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष सुधाकर पानझाडे, दलितमित्र सुधाकर विरुळकर, प्रकाश शेलापुरकर, पांडुरंग गोंडेकर, देविदास किटे, डॉ.विजय तायडे, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे, शहर अध्यक्ष योगेश पखाले, रामदास तायडे, प्रा.संजय खडसे, सर्वोदय कॉलणीचे अध्यक्ष सुधाकर नाचणे, सचिव नरेंद्र गणोरकर, बि.टी.इंगळे आदिसह परिसरातील समाज बांधव तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बाबासाहेबांनी सर्वघटकांना तिमिरातून तेजाकडे नेले-अढाऊ



**वरूड** – प्रतिकुल परिस्थितीत स्वत:ला घडविले. ज्या शाळेच्या बाहेरुन विद्या प्राप्त केली, त्या ज्ञानाच्या बळावर लिहिलेल्या राज्यघटनेने समाजाला स्थैर्य दिले. बाबासाहेबांनी सर्व समाज घटकांना तिमिरातून तेजाकडे नेल्याचे प्रतिपादन मुख्याध्यापिका सुरेखा अढाऊ यांनी केले.जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा मोरचूंद येथे ता.6 डिसेंबर ला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. विचार पीठावर प्रमुख अतिथी म्हणून शिक्षक धनराज शेळके, प्रकाश विंचूरकर,ममता वैष्णव,प्रीती लायबरे,छाया वाघ उपस्थित होते. अढाऊ बोलताना पूढे म्हणाल्या की,शिक्षण हे वाघीणीचे दुध जो पिणार तो गुरगुरणार या बाबासाहेबांच्या सुभाषीताचा विद्यार्थ्यांनी जीवनात उपयोग करावा.शिक्षण हे कोणत्याच परिस्थिमुळे अडू शकत नाही.प्रतिकुल परिस्थितीत घडलेले बाबासाहेब विद्यार्थ्यांनी डोळ्यापुढे आदर्श म्हणून ठेवले पाहिजे. यावेळी शाळेच्या विद्यार्थीनी कु.श्रावस्ती सिद्धार्थ वाघ, दृष्टी नंदकिशोर ठाकरे,मैत्री विजय वाघ, अनुष्का विजय वाघ यांची भाषणे झाली. बाबासाहेबांनी शिक्षकांना शाळेत बसु देण्याची विनंती करणारा प्रसंग शाळेचे शिक्षक धनराज शेळके यांनी सुमधुर गीतातून व्यक्त केला तेव्हा विद्यार्थ्यांच्या टाळ्यांनी परिसर दणाणून गेला.यावेळी छाया वाघ यांनीही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर गीत गाऊन अभिवादन केले. यावेळी ममता वैष्णव,प्रीती लायबरे,यांची भाषणे झालीत.कार्यक्रमाचे संचालन प्रास्ताविक प्रकाश विंचूरकर यांनी केले.प्रीती लायबरे यांनी आभार व्यक्त केले.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन रॅली



**दर्यापूर**- दर्यापूर येथे समस्त बौद्ध समाजाच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरीनिर्वाण दिन शांतता रॅली कडून संपन्न झाला. तसेच बौद्ध समाज मंदिरात प्रार्थना करण्यात आली. यावेळी मोठया प्रमाणात बौध्द समाजातील सर्व बांधव उपस्थित होते. यावेळी विविध चौकातून शांतता रॅली काढून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

# बच्चूभाऊ तूमचे चूकलेच !

**बच्चू कडू या नावाला महाराष्ट्रात परिचयाची गरज नाही. स्वत:च्या मेहनतीने आणि तेही जनतेची सेवा करत हळूहळू राजकारणाची कास धरुन संपुर्ण महाराष्ट्रात बच्चू या नावाचा डंका वाजवणारा माणुस म्हणजे बच्चू कडू ! पण त्यालाही या निवडणुकीत जनतेनी नाकारले, हे कुणाच्याच पचणी पडत नाही.असे काय बरे झाले की, बच्चू भाऊंना जनतेनी नाकारले ? याचेही कुठेतरी विश्लेषण होणे आवश्यक आहे.बच्चूभाऊ, तूमचे काय चुकले याचाही अभ्यास तुम्ही करायला हवा. बच्चू कडू हे रसायन 1997- 98 च्या काळात अमरावती जिल्ह्यात उदयास आले आणि 2000 नंतर या रसायनाने अमरावती जिल्ह्यातील राजकारणात राजकीय उलथापालथ करायला सुरवात केली.पण ती कुण्या नेत्याच्या किंवा वडीलोपार्जीत राजकारणाच्या भरवशावर नाही, तर स्वत:च्या मेहनतीवर ! मग त्यासाठी अनेक आंदोलने करावी लागली असो कींवा पोलीसांच्या लाठीचा मार खावा लागला असो ! याला अमरावती जिल्ह्यातील आता उदयास आलेले राजकारणी चांगले ओळखून आहेत यात शंका नाही.बच्चू कडूने आपल्या राजकीय वाटचालीला रुग्णसेवेची जोड दिली.राजकारणात एखादी व्यक्ती रुग्णसेवेमुळे मोठी होऊ शकते ही महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील कदाचीत पहीलीच व्यक्ती असेल.पहील्या वेळेस आमदारकीची निवडणुक हरल्यानंतर ढसाढसा रडणारे कार्यकर्ते या रुग्णसेवेतूनच बच्चूभाऊला भेटतांना आम्ही बघितले.मग लोकसभेची निवडणुक आली. ती सुध्दा जनतेतून पैसा गोळा करुन लढवली.पराभव झाला पण तो पराभव विजयापेक्षा कमी नव्हता.**

रुग्णसेवा करता करता दिव्यांगांच्या सेवेची कास धरली ती संपुर्ण महाराष्ट्रातील एक मोठी क्रांती झाली.दीव्यांगाच्या मागण्या पुर्ण करण्यासाठी आपल्या आंदोलन चातूर्याने सीएसटी मुंबई येथील रेल्वे स्टेशन काही वेळ बंद पाडण्याची किमया ही फक्त बच्चू कडुनेच करुन दाखवली.

बच्चू कडू म्हणजे आदोलन ! हे समीकरण संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेला माहीत आहे.आंदोलनातून समाजविघातक कृत्य न करता बच्चूभाऊचे कार्यकर्ते हजारो बॅग रक्त दरवर्षी रक्तपेढीत देतात.अशा आगळ्यावेगळ्या आंदोलनाची सुरवात बच्चू कडूनेच महाराष्ट्रात रुजवली.शासनाच्या एखाद्या निर्णया विरोधात आंदोलन करायचे असल्यास झाडे लावून,रक्त देऊन,किंवा गाव स्वच्छ करुन निषेध करण्याचा प्रयोग बच्चू कडूनेच महाराष्ट्रात रुजवला.

आज अनेक आंदोलक शोले आंदोलन करतात, पण या शोले आंदोलनाची सुरवातही बच्चू कडूनेच महाराष्ट्रात रुजवली. तेव्हा खुद्द गृहमंत्री बच्चूभाउला भेटायला पाण्याच्या टाकीवर चढले होते हे संपुर्ण महाराष्ट्राने बघितले यात शंका नाही. शासनाच्या चूकीच्या निर्णया विरोधात आमदार असतांनाही स्वत: ला गड्डयात गाडून घेणारा हा बच्चू कडूच होता.महाराष्ट्रातील एकही मोठे हा ?स्पीटल नसेल जिथे बच्चू कडूने कुण्या रुग्णासाठी फोन करायचे सोडले असेल. मग एवढी जनसेवा असतांनाही बच्चू कडू निवडणूकीत पराजीत झाले कसे ? याचाही अभ्यास करायला हवा.बच्चू कडूच्या कारकिर्दिची सुरवातच क्रांतीकारी असल्याने त्यांनी कधीही जात,धर्म,पंथ,याला थारा दिला नाही.प्रहार संघटनेच्या झेंड्यात कोणता रंग मिसळला नाही. हीच त्यांची सर्वात मोठी चूक.बच्चू कडूने निवडणुक काळात थोडेफार गणित जूळवण्यासाठी राजकारण केलेही असेल, पण ते कधी उघड होऊ दिले नाही.कारण जातीपातीचे राजकारण मतदारसंघाच्या बाहेर गेले असते तर बंच्चू कडु केव्हाच संपला असता आणि हीच बच्चू कडुची सर्वात मोठी चूक झाल्याचे वाटते.धर्माचे,जातीचे,गटाचे राजकारण बच्चू कडूने केले असते तर त्यांचा पराभव झाला नसता.आज आपण किती ही कारणमिमांसा करित बसलो,पुरोगामी विचाराचा झेंडा घेऊन उभे असलो तरीही जात,धर्म याच विषयावर निवडणुक लढवली जाते हे त्रिकालाबाधीत सत्य आहे.



त्यासाठी कुणाला रुग्ण सेवा करण्याची गरज नाही,कुणाला रक्त दान करण्याची गरज नाही.वेळेवर या तिकीट घ्या, प्रचंड पैसा खर्च करा,प्रचारासाठी भाड्याने कार्यकर्ते आणा हे बच्चूभाऊने कधिही केले नाही.मला आठवते 1999 ला जेव्हा बच्चूभाऊ एका रुग्णाला घेऊन दवाखान्यात आले आणि त्यांची चप्पल हरवली. या व्यक्ती जवळ चप्पल घेण्याचीही सोय नव्हती.

चांदुरबाजारात पोहचल्यावर जेव्हा अनवाणी दिसले तेव्हा एका दुकानदाराने स्वत: चप्पल पायात घातली.शंभरच्या वर रक्तदान करणा्या ,हजारो दिव्यांगाना आधार देणारा व्यक्ती जर फक्त जात,धर्म,या विषयामुळे जनता नाकारत असेल तर हा त्या जनतेचा सर्वात मोठा करंटेपणा होय असे मला वाटते.

बच्चू कडूच्या प्रहारने अंजनगाव सुर्जी तालुक्यातही प्रदिप निमकाळेच्या नावाने एक मशाल पेटवली होती ती आजही कायम आहे.अशा अनेक मशाली संपुर्ण महाराष्ट्रात बच्चू कडूने पेटवल्या. राजकारणात सेवा, इमानदारी ही एक चांगली गोष्ट रुजवण्याचा प्रयत्न केला पण जनतेला या पेक्षा धर्म मोठा वाटतो हे या निवडणुकीने दाखवून दिले. बच्चूभाऊ म्हणुन तूम्ही चूकलेच ! तूम्ही सेवेचे राजकारण करण्यापेक्षा जाती धर्माच्या गणिताचे राजकारण केले असते तर आजही तूम्ही विधानभवनात असते,तूम्ही चूकलेच कारण तूम्ही कार्यकर्यांना सोडले नाही,तूम्ही चूकलेच कारण तूम्ही शेतर्कयांचा विचार केला,तूम्ही चूकलेच कारण तूम्ही युवा पीढीला चांगला मार्ग दाखवीला. कदाचित तुमच्यासारखा वेडा राजकारणी पुन्हा होईल हे महाराष्ट्राला बघायला मिळेल हे त्यांचे नशिब आणि कुणि म्हणेल सेवा करायची तर तशी ही होऊ शकते.पण राजकारणाला सेवेची जोड देणारे आपल्यासारखे फार कमी राजकारणी या गोंगाटात भेटतील.तूमचे राजकीय गणित चूकले असेल पण सेवेच्या गणितात तूमच्यासारखा श्रीमंत या महाराष्ट्रातच नाही तर देशातही शोधून सापडणार नाही.पण तरीही वाटते बच्चूभाऊ तूमचे चूकलेच ! तुम्ही निवडून यायला पाहीजे होते.

**प्रविणकुमार बोके.**
**अंजनगाव सुर्जी.**